RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ११९(३)] शुक्रवार, ऑक्टोबर २५, २०१९/कार्तिक ३, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २७४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ ऑक्टोबर २०१९.

**अधिसूचना**

**स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण. २०१९/प्र.क्र. १२९(भाग-१)/दुवपु-२.— स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ (२०१६ चा अधिनियम क्रमांक १६), याच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्रमांक रेरा. २०१७/प्र.क्र. ११६/दुवपु-२, दिनांक २८ डिसेंबर २०१७ याचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, वेळोवेळी नियुक्त करील अशा पुढील सदस्यांचा समावेश असलेले महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण महाराष्ट्र राज्याकरिता स्थापन करीत आहे :—

(एक) उच्च न्यायालयाचा एक निवृत्त न्यायाधीश,

(दोन) एक न्यायिक सदस्य, आणि

(तीन) एक प्रशासकीय/तांत्रिक सदस्य.

उक्त न्यायाधिकरण, दिनांक २४ डिसेंबर २०१८ पासून कार्यरत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रामचंद्र कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 24th October 2019.

*NOTIFICATION*

REAL ESTATE (REGULATION AND DEVELOPMENT) ACT, 2016.

No. Misc. 2019/C.R. 129/(Part-1)/RR-2.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 43 of the Real Estate (Regulation and Development) Act, 2016 (Act No. 16 of 2016), and in supersession of the Government Notification, Housing Department, No. Rera. 2017/C.R. 116/DVP-2, dated the 28th December 2017, the Government of Maharashtra establishes the Maharashtra Real Estate Appellate Tribunal for the State of Maharashtra consisting of the following, as may be appointed, from time to time :—

(*i*) A Retired High Court Judge,

(*ii*) A Judicial Member ; and

(*iii*) An Administrative/Technical Member.

The said Tribunal has been functional with effect from the 24th December 2018.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. K. DHANAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.